# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा

पत्ता :- जिल्हा परिषद आवार, सातारा
सातारा पीन कोड नं. ४१५ ००१

दूरध्वनी /फॅक्स : ०२१६२/२३४१८९
ईमेल : drdasatara@gmail.com

---

2923/2928
जा.क्र.जिग्राविय/स्वग्रायो/जा.नि./ /१३

दिनांक – ३०/१०/२०१३

प्रति,
संपादक,
१)दैनिक सकाळ,रजतसागर कॉम्पलेक्स, पोवई नाका सातारा सातारा
२)दैनिक ग्रामोध्दार,२२८ रविवार पेठ सातारा.
३)साप्ताहिक लोकजागर,सिध्दीविनायक चेंबर्स,३२२ कसबापेठ, शंकर मार्केट फलटण

विषय – जाहिरात देणेबाबत.

या कार्यालयामार्फत सन २०१३-१४,२०१४-१५,व २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी नवीन सनदी लेखापालांची नेमणूक करणेकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देणेची आहे.तरी सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे दि.०१.११.२०१३ च्या अंकामध्ये सदरची जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी. जाहिरातीचे देयक प्रसिध्दीच्या अंकासह या कार्यालयास पाठविण्यात यावे.देयकाची रक्कम धनादेशाने आदा करण्यात येईल.

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
सातारा

GRAMODDHAR DAILY

Sakal – E

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा

पुणे विभागातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,सातारा कडील केंद्र पुरस्कृत योजनांचे सन २०१३-१४,२०१४-१५,व २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांचे पॅनल मा.सचिव ग्रामविकास,महाराष्ट शासन यांचे मान्यतेने करावयाचे आहे.त्या करिता इच्छुक सनदी लेखापालाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत अर्जासोबत जेष्ठता,अनुभव व्यवसायाचे ज्ञान (स्थानिक किंवा जिल्हयाबाहेरील) लेखापरिक्षणाची विनाअट लेखी संमती,अग्रक्रम,कर्मचारी संख्या,सन ११-१२ व १२-१३ चे आयकर विवरण पत्र व भारतीय सनदी लेखापाल संस्थेचे सदस्यत्व प्रमाणपत्र इ.तपशील सादर करणे आवश्यक आहे.

१.लेखापरिक्षणासाठी शुल्क खालीलप्रमाणे आहे.

अ) रुपये ५० कोटी पर्यत खर्च असणा-या कार्यालयांसाठी रुपये -५००००/-

आ) रुपये ५,००,००,०००१/-ते ७५,००,००,०००/- खर्च असणा-या यंत्रणा कार्यालयासाठी रुपये.-६०,०००/-

इ) रुपये ७५,००,००,०००/-पेक्षा जास्त खर्च असणा-या कार्यालयांसाठी रुपये -७०,०००/-वर नमूद केलेले लेखापरिक्षणाचे शुल्क या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क/कर इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाही.

ई) लेखापरिक्षणामध्ये गटपातळीवरील व ग्रामपातळीवरील लेख्यांचा समावेश राहील.

उ) लेखापरिक्षण अहवाल जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास सादर करण्याबाबतची मुदत आणि विहीत मुदतीत अहवाल यंत्रणा कार्यालयास सादर न झाल्यास दंड वसूल करण्याचा अधिकार संस्थेस राहील यासाठी यंत्रणा कार्यालयाशी लेखी करार करावा लागेल.

ऊ) वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीराती संबंधी व यंत्रणेच्या योजनेसंदर्भात आधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद विस्तारित इमारत सातारा येथे संपर्क साधावा इच्छुक सनदी लेखापालांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा या कार्यालयाशी संपर्क साधून आपले विहित नमुन्यातील अर्ज,प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा कार्यालयामध्ये जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून १० दिवसापर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत.सदर प्रस्ताव/अर्ज विभागगीय आयुक्त कार्यालयाकडे परस्पर पाठवू नयेत.पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

मु.का.अ. जि.प. तथा अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
सातारा करिता